**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)
**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** गडहिंग्लज
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0041 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/01/2025 03:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 20/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/01/2025
**Time From (वेळेपासून):** 09:20 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 01:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/01/2025 **Time (वेळ):** 02:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/01/2025 02:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** स्वराज्य हस्पिटल, गडहिंग्लज,गडहिंग्लज, 416502

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

प्रत मिळाली

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): ईश्वर महादेव घाळी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1995

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पेन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा मुपोशेंद्री, ,तागडहिंग्ल,गडहिंग्लज,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा मुपोशेंद्री, ,तागडहिंग्ल,गडहिंग्लज,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9021808531

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजित वसंतराव पाटोळे | | | 1. रा2344 साधना हायस्कुलजवळ, रा,गडहिंग्लज, गडहिंग्लज,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | इंद्रजित शिवाजीराव पाटोळे | | | 1. मिसाळ चाळ,आझाद रोड, गडहिंग्लज,,गडहिंग्लज,, गडहिंग्लज,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपयाच्या सोळा नोटा | 8,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

8,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

दिनांक - 21/01/2025

मी ईश्वर महादेव घाळी, वय 30 वर्षे, धंदा- शेती, रा. मु.पो.शेंद्री, ता.गडहिंग्लज जि.कोल्हापुर मो.नं. 9021808531 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहून फिर्याद देतो की,

मी दिनांक 17/01/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांना फोनवरून माझी ओळख करून देवून माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगितली की, माझा मित्र अमर आनंदा नाईक हे चक्कर येवुन पडल्याने त्यांचे डावा खुबा फॅक्चर झाला.खुब्याचे ऑपरेशन महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य या योजनेतुन करून शासकिय योजनेचा लाभ मिळवुन देण्याच्या हेतुने स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लजचे डॉक्टर अजित पाटोळे व तेथील व्यवस्थापक इद्रजीत पाटोळे यांनी माझेकडे 20,000/-रू मागणी करून त्यातील 10,000/-रू ऑपरेशन पुर्वी स्विकारून उर्वरीत 10,000/-मागणी करीत असलेबाबत तक्रार सांगुन त्यांचेवर कारवाई करणेबाबत विनंती केली.त्यावेळी पाटील मॅडम यांनी पोलीस निरीक्षक बापु साळुंके हे माझेशी संपर्क साधतील व ते पुढील कारवाई करतील असे सांगितले. काहीवेळाने साळुंके साहेबांनी माझेशी संपर्क केला त्यावेळी मी साळुंके साहेबांना माझी वरीलप्रमाणे थोडक्यात तक्रार सांगितली. व त्यांना गडहिंग्लज येथे आल्यानंतर माझा लेखी तक्रारी अर्ज देत असल्याबाबत सांगितले त्यानंतर साळुंके साहेब यांनी मला ते स्टाफ व पंचासह दिनांक 18.01.2025 रोजी गडहिंग्लज येथे आल्यानंतर फोन करून कोठे भेटायचे या बाबत सांगतील त्या ठिकाणी मला येण्यास सांगीतले.

दि. 18/01/2024 रोजी सकाळी पोलीस निरीक्षक साळुंके साहेब यांनी माझेशी संपर्क करून गडहिंग्लज येथे पांढरे रंगाचे शासकीय टाटा सुमोने पोहचत असल्याचे सांगुन भेटण्याचे ठिकाणाबाबत विचारले. त्यावर मी यांना गडहिंग्लज येथे महिंद्रा शोरूमजवळ येण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी गडहिंग्लज येथील महिंद्रा शोरूमजवळ गेलो त्यावेळी साळुंके साहेब व त्यांचेकडील स्टाफ काही वेळाने पोनि साळुंके साहेब शासकीय टाटा सुमोने तेथे हजर होते. त्यांनी मला गाडीजवळ बोलवुन माझे नाव-पत्ता विचारून आपली व सोबत असले दोन पंच आणि स्टाफची ओळख करून दिली. तेथे रस्त्यावर लोकांची वर्दळ व वाहनाची रहदारी असल्याने मी माझे मोटर सायकलने व पोनि साळुंके साहेब व सोबतच्या लोकांना तेथुन हटटीबसवाण्ण गावातील हट्टीबसवाण्णा विद्यामंदिराचे समोरील मोकळ्या जागेमध्ये घेवुन गेलो. तेथे गेल्यावर पोनि साळुंके साहेबांनी मला त्यांचेकडील गाडीमध्ये बोलावुन घेतले, तेव्हा मी डॉक्टर अजित पाटोळे व इंद्रजित पाटोळे यांचेवर लाच मागणीबाबत कारवाई होणेसाठीचा तक्रारी अर्ज दिला तो खालील प्रमाणे

मी वरीलप्रमाणे गावचा रहिवाशी असुन माझे शेंद्री गावातील माझा मित्र अमर आनंदा नाईक वय 24 वर्षे हे माझे कडे गेले 3 वर्षापासुन मजुरीचे काम करत आहे. दि.10/01/2025 रोजी सायं.05.00 वा. सुमारास अमर हा आमचे गावातील सिद्धारूढ मठाजवळ चक्कर येऊन तो खाली पडल्याने त्याचे डावे खुब्यास मुक्का मार लागल्याने अमर यास त्याचे घरी सोडले. दुसर्या दिवशी दि.11/01/2025 रोजी अमर याचा खुबा जास्त दुखु लागल्याने त्यास मी व माझा मित्र राजु शंकर हुल्ले असे उपचाराकरीता सरकारी दवाखाना उप जिल्हा रूग्णालय, गडहिंग्लज येथे घेऊन गेलो होतो. तेथील डॉक्टरांनी अमर याचेवर प्राथमिक उपचार करून एक्स रे काढला असता त्याचे डाव्या खुब्याचे हाड फॅक्चर असल्याने ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले परंतू सरकारी दवाखान्यात ऑपरेशनची सुविधा उपलब्ध

नसल्याने बाहेर ऑपरेशन करावे लागेल असे मला सांगितले असता तसे अमर याचा भाऊ अक्षय आनंदा नाईक यास माहिती दिली. अमर याची आर्थिक परिस्थिती हालाकिची असल्याने अमरचे
ऑपरेशन महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतुन करणेचे आम्ही ठरवून त्याची चैकशी स्वराज्य हॉस्पीटल, गडहिंग्लज येथे करून मी व अक्षयने दि.13/01/2025 रोजी अमर यास उपचाराकरीता स्वराज्य हॉस्पीटल येथे अँडमिट केले. तेथील डॉ.अजित पाटोळे व तेथील कर्मचारी इंद्रजित पाटोळे यांनी अमर नाईक यांचे ऑपरेशन महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य या शासकीय योजनेतुन करणेकरीता २०,०००/-रुपये द्याव लागतील तरच ऑपरेशन होईल असे आम्हाला सांगितले. अमरचे ऑपरेशन करणे गरजेचे असल्याने मी दि. 15/1/2025 रोजी सायंकाळी 6.00 वा. सुमारास माझ्या जवळील 10,000/- रुपये डॉ अजित पाटोळे यांचे सांगणे वरुन इंद्रजीत पाटोळे यांचेकडे पैसे दिले त्यावेळी त्यांनी दिलेल्या पैशाबाबत कोठेही तक्रार करणार नाही असे एका कागदावर लिहून घेवून त्यावर अमर याची बहिण दिपाली वैभव जाधव तिचे पति वैभव जाधव व माझी सही घेतली. त्यानंतरच त्यांनी दि. 16/01/2025 रोजी माझा मित्र अमर नाईक याचे ऑपरेशन केले. व डॉ.अजित पाटोळे व तेथील कर्मचारी इंद्रजित पाटोळे यांनी माझेकडे राहिलेल्या 10,000/- रुपयाची मागणी केली. मी त्यांना पैशाची जुळना करुन येतो असे सांगुन माझा मित्र अमर यास डॉक्टर अजित पाटोळे व कर्मचारी इंद्रजित पाटोळे हे माझाकडे पैसे मागणी करत असलेबाबत सर्व हकिगत सांगितली.

डॉ.अजित पाटोळे व इंद्रजित पाटोळे यांनी माझा मित्र अमर याचे उपचार महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतुन मोफत करणे बंधनकारक असतानाही माझेकडे 20,000/-रुपयाची मागणी करुन त्यातील 10,000/- रुपये यापूर्वी घेऊन उर्वरीत 10,000/- रुपये मागणी करत असून तो लाच असल्याची माझी व माझा मित्र अमर नाईक याची खात्री झाल्याने अमर याची पैसे देण्याची ईच्छा नसल्याने आम्ही सहमताने तक्रार देण्याचे ठरविले. त्यावेळी अमर यानी मला त्याचेवतीने लाचलुचप्रतिबंधक कार्यालय, कोल्हापूर येथे डॉ. पाटोळे व इंद्रजीत पाटोळे यांचे विरोधात तक्रार देण्यासाठी व पुढील कार्यवाही करण्यासाठी संम्तीपत्र दिले. डॉ. पाटोळे व इंद्रजीत पाटोळे यांचेशी आमचे कोणतेही आर्थिक व्यवहार अथवा वादविवाद नाहीत. त्यांना लाच म्हणून देणारी रक्कम ही माझ्या हात शिल्लक रकमेतून देणार आहे. त्यांना मी दि.18/01/2025 रोजी दु.1.00 वा. नंतर त्यांची भेट घेणेस जाणार आहे. तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. साळुंके साहेबांनी तक्रारी अर्ज वाचुन पाहिले व मला माझी तक्रार पंचांना सांगणेस सांगितली मी दिलेला तक्रारी अर्ज व सांगितलेली तक्रार एकच असल्याची खात्री करून पोनि साळुंके साहेबांनी व पंचांनी तक्रारी अर्जावर सह्या केल्या.

त्यानंतर साळुंके साहेबांनी कारवाई चालु केली साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच पंचनामा देवुन स्वराज्य हॉस्पिटल येथील डॉक्टर अजित पाटोळे व व्यवस्थापक इंद्रजेत पाटोळे यांना भेटणेस सांगितल्याने डॉक्टर अजित पाटोळे व इंद्रजित पाटोळे यांचे लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने आम्हाला आवश्यक सुचना देवुन साहेबांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळ्यात अडकवुन मला व पंच नं.1 माळु बंडगर असे माझेकडील बजाज कंपनीची सीटी 110 एक्स मोटरसायकल क्र. डभ्.09.ळम्.2298 यावरून स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज येथे पाठवुन दिले आम्ही स्वराज्य ळम्.2298 यावरून स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज येथे पाठवुन दिले. येथे जावुन गाडी ळम्.2298 यावरून स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज येथे पाठवुन दिले.च्या बाहरे पार्क केली. त्यानंतर मी व पंच नं. 1 बंडगर असे स्वराज्य ळम्.2298 यावरून स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज येथे पाठवुन दिले.मध्ये गेलो तेथील रिस्पशेन याठिकाणी असणारे महिला यांना मी डॉक्टर आहेत काय असे विचारले त्यावेळी त्यांनी डॉक्टर बाहेर गेल्याचे सांगितले व ते सोमवारी भेटणार असल्याचे सांगितले. तुम्हाला काय बोलायचे असल्यास डॉक्टर मॅडम आहेत असे सांगितले त्यावेळी मी इंद्रजेत पाटोळे यांचेबाबत विचारणा केली त्यावेळी त्यांनी ते ऑफिसमध्ये असल्याचे सांगितले. त्यावळी मी व पंच असे हॉस्पिटलच्या पहिल्या मजल्यावर जावुन इंद्रजित पाटोळे यांना भेटलो त्यावेळी त्याना मी अमर नाईक याचे अँप्रुवल आले आहे काय या बाबत विचारले त्यावेळी इंद्रजित याने अँप्रुवल आल्यानंतरच ऑपरेशन झाल्याचे सांगितले व त्यादिवशी संध्याकाळपर्यंत आलं नव्हतं ते मरायला नको म्हणुन इमर्जन्सी ऑपरेशन केल्याचे सांगितले.त्यानंतर मी डॉक्टर कोठे गेले याबाबत विचारणा केली त्यावेळी इंद्रजित यांनी डॉक्टर बाहेर गेल्याचे सांगीतले त्यानंतर मी नंतर काय पैसे भरायला लागणार नाही असे विचारले त्यावेळी इद्रजित याने योजणेतण तुमचं मोफतच हाय ओ तुमचं बाकीचं हे हाय कणी हे तुमचं जॉडीस, जॉडीस हाय त्यांना कावीळ परत हे ब्लड रिलेटी लिव्हरला सुज हाती त्याच्या ते प्लस त्यांचे आल्कोहोल विड्राव्ह होती असे कारण सांगितले व त्याचे मिळुन ते केलय असे सांगितले. तरोच योजना सोडुन ऑपरेशन केलय असे सांगितले. त्यानंतर मी डीसचार्जबाबत विचारणा केली त्यावेळी इंद्रजितने सोमवारी डीसचार्ज मिळेल असे सांगितले.त्यानंतर जमा करा की तुम्ही असे सांगितले.त्यावेळी मी परवा 10000/-रु दिल्याचे सांगितले. त्यावेळी इंद्रजितने 20,000/-रु झाल्याचे सांगितले.त्यावेळी मी काहीतरी कमी करण्यास

सांगितले. त्यावेळी इंद्रजितने त्यात वाढायला लागलय आम्ही बाहेरच्या डॉक्टरांना बोलवायला नाही असे सांगितले त्यावेळी मी कमी करण्याबाबत पुन्हा कारण सांगितले आमचेत तडजोडीबाबत बोलणे झाले त्यानंतर मी डॉक्टरांशी बोलतो असे सांगितले. त्यावेळी इंद्रजितने डॉक्टरांनी पॅकेजमध्ये सांगितल्याचे सांगितले.असे सांगुन वर काय करू नका वाढले तर 2000/-रू वाढु शकतात असे सांगितले.त्यानंतर आमचेत पैसे कमी करणेबाबत बोलणे झाले त्यानंतर मी पैसे एका तासात आणुन देतो असे सांगितले त्यावेळी इंद्रजित याने पैसे लवकर आणुन देण्यास सांगुन आॅपरेशन केलेल्या लोकांचे पैसे दयायचे असल्याचे सांगितले त्यावेळी मी तिन साडेतीन वाजेपर्यंत येतो असे सांगितले त्यानंतर इंद्रजितने ऑपरेशन आधिच पैसे भरून घेतोय असे सांगुन नंतर फाटे फुटतात असे सांगितले तसेच यापुर्वी एका पेशन्टने सत्तर हजार रूपयाला फसवल्याचे सांगुन त्याबाबत बोलणे झाले.त्यानंतर मी डॉक्टरांशी बोलणे करून देण्याबाबत विनंती केली त्यावेळी इंद्रजितने सरांशी विषय काय नाही एकदा ठरलं असतयं त्यात वाढत असतयं कमी होत नसतयं त्यांनी आणि पाच दहा हजार दे म्हणतील डिस्चार्जच्या वेळी बघ त्यावेळी काय करणार तू त्यामुळं आता जेवढं सांगितलयं तेवढं करून ठेव शांत बस समजलय काय मी सांगणार हाय कारण मीच सगळं बघतोय मलाच माहिती हाय सगळं कारण तिथणं गेलं तर आणि फिरूण माझेकडच येणार असे सांगितले.त्यानंतर पैसे कमी करणेबाबत व नविन कामगारांच्या स्किम बाबत बोलणे झाले.त्यानंतर मी 10,000/-रू दिल्यानंतर पैसे भरायचे नाहीत नव्हे असे विचारले त्यावेळी इंद्रजित याने नाही रे लागलं तर मी सांगतो की पण आताच मी नाही म्हणून सांगायला लागलोय लागलं तर सांगतो की, का लागतील ते पण सांगतो तुझ्या ते टेस्टला बाहेरचे डॉक्टर चुकून बोलवलं तर सायक्रॅट्रिक सांगतो अल्कोहोल विड्राव्ह साधं वाटत नाही अल्कोहोल विड्राव्ह म्हणजे काय माहिती हाय तो जर विचित्र वागायला लागला कणी त्यावेळी बोलवायला सायक्रॅट्रिकला ते करणार नाही जा तु टेन्शन घेवू नकोस जा तू असे सांगितले त्यावेळी मी एका तासात फोन करून येतो असे सांगुन तेथुन आम्ही तेथुन निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली.त्योवळी साळुंके साहेबांनी डॉक्टर पोटोळे हे बाहेर गेल्याने त्यांना फोन करून कधी येणार याबाबत विचारणा करण्याचे ठरविले त्याप्रमाणे मी माझा मोबाईल क्र. 9021808531 यानंबरवरून डॉक्टर पाटोळे यांचे मोबाईल नंबर 9545814614 वर फोन केला त्यावेळी डॉक्टर पाटोळे यांनी ते बाहेर असल्याचे सांगुन रविवारी संध्याकाळी भेटणार असल्याचे सांगितले त्यावेळी साळुंके साहेबांनी डॉक्टर हे रविवारी संध्याकाळी बाहेरून आल्यानंतर भेटणार नाहीत ते सोमवारी दिनांक 20.01.2024 रोजी हॉस्पिटलमध्ये भेटतील त्यावेळी त्यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविले. दिनांक 20.01.2024 रोजी मी साळुंके साहेबांचे सपंर्कात होतो मी सांगितलेल्या ठिकाणी रिंगने मळा, हिरण्यकेशी नदीपरीसर गडहिंग्लज शहर येथे सकाळी 11.55 वा. स्टाफ व पंचासह आले डॉक्टर अजित पाटोळे हे हॉस्पिटलमध्ये आले असल्याची खात्री करण्यास सांगितली ते हॉस्पिटलला आल्याची खात्री झाल्यानंतर साळुंके साहेबांनी मला व पंचाना डॉक्टर पाटोळे हे इंद्रजित पाटोळे यांचे 10,000/-रू लाचेच्या मागणीस संमती देतात अगर प्रत्यक्ष लाचेची मागणी करतात काय याची आपण पडताळणी करणार आहोत असे सांगितले त्याबाबत मला व पंचना सुचना देवुन व्हाईस रेकॉर्ड चालु करून माझे गळयामध्ये आडकवुन मला व पंचाना स्वराज्य हॉस्पिटल येथे डॉक्टर अजित पाटोळे यांची भेट घेण्यास माझे मोटर सायकलवरून पाठवुन दिले. आम्ही स्वराज्य हॉस्पिटल येथे गेल्यावर तेथे डॉ पाटोळे हे ओपीडीमध्ये होते त्यांचेकडे पेशन्ट जास्त असल्यामुळे आम्ही बाहेर थांबुन होतो काहीवेळाने तेथे इंद्रजित पाटोळे हे आले त्यांना मी सरांना भेटुया असे सांगितले त्यावेळी इंद्रजित यांनी काय करायला असे विचारले व त्यात काय चेंजेस होतील काय असे विचारले त्यावेळी मी चेंजेस करायला नाही डीस्चार्जचे प्रोसिजर बाबत भेटणार असल्याचे सांगितले त्यावेळी इंद्रजित यांनी डीस्चार्ज प्रासिजर त्यांनी केल्याचे सांगितले त्यानंतर मी पंच व इंद्रजित असे डॉ.पाटोळे यांचे केबिनमध्ये गेलो तेथे भेटायला आल्याचे सांगितले व डिस्चार्ज झाल्यावर कसं काय काय असे विचारले त्यावेळी डॉ. अजित पाटोळे यांनी ते सांगतो तुम्हाला अगोदर पहिले ठरलेले पुर्ण करा 20,000/-रू च असे सांगीतले त्यावेळी मी ते 20,000/-रू चे काय असे विचारले त्यावेळी डॉ पाटोळे यांनी हं असे म्हणुन तो दारू पितोय दवाखान्यात ठेवल्यावर तो मरेल म्हणुन डीस्चार्ज करतोय असे सांगितले व अमर यास एक महीना चालायचे नाही दहा दिवसांनी टाके काढायचे कॅलशीयमची गोळी खाउ दे, दारू सोडायचे काय प्रयोग करायचे ते तुम्ही घरी करा असे सांगितले त्यावेळी मी योजणेतुन झालय ते असे विचारे त्यावेळी डॉ पाटोळे यांनी योजणेतुन केलय बाकीचे ते आम्ही एकस्ट्रा बिले असे सांगितले त्यावेळी मी त्यांना महात्मा फुले योजणेतुन बसतय का असे विचारले त्यावेळी डॉ पाटोळे यांनी जे काय असेल ते आम्ही केलय जे एकस्ट्रा काय लागतय आल्कोलिक या सगळ्या गोष्टीचे चार्जेस दयावे लागतील असे सांगुन इंद्रजित याला लिहुन घेतलेस ना असे विचारून पैसे जमा करून घेण्याबाबत सांगितले त्यावेळी मी जे 20000/-रू दयायला लागलोय ते मी माझे वैयक्तीक दयायला लागलोय असे सांगितले व बिल मिळणार काय असे विचारले त्यावेळी डॉ पाटोळे यांनी बिल देवु शकत नाही असे स्पष्ट सांगितले. त्यानंतर त्यांचे घरच्याबाबत बोलणे केले व त्यानंतर डॉ पाटोळे यांनी तुमच्याकडुन पैसे घेतले आहेत नशिब तो मेला असता चार

डॉक्टर बाहेरून बोलविले आहेत मी नसताना आल्कोहो विड्राव्ह मध्ये गेलाय त्याच्या रक्ताच्या गाठी पण पसरल्यात सगळी ट्रीटमेन्ट केली आहे आम्ही असे सांगितले. त्यानंतर त्याला काय ट्रिटमेन्ट दिली आहे याबाबत बोलणे होवून डिस्चार्ज दिल्यानंतर काय करूनये काय करावे याबाबत बोलणे झाले त्यानंतर इंद्रजित यांचेकडे पैश्याचे करण्यास सांगितले त्यानंतर मी डॉक्टर पाटोळे यांना परवा 10,000/-रू दिल्यात त्यावेळी डॉपाटोळे यांनी हा असे म्हणुन संमती दिली त्यानंतर मी उर्वरीत 10,000/-रूपयामध्ये काहीतरी कमी करण्यास सांगितले असता त्यावेळी इंद्रजित याने पैसे वाढणार असल्याचे व बाहेरून डॉक्टर बोलविल्याचे सांगितले त्यावेळी डॉ. पाटोळे यांनी यापुर्वी घेतलेल्या 10000/- रू.सह एकूण 18000/-रू देण्यास सांगितले त्यावेळी मी डॉक्टर यांना आता 8000/-रू दयायचे काय असे विचारले त्यावेळी डॉ. पाटोळे यांनी दयायचे असे सांगितले. त्यानंतर केबिनच्या बाहेर येवुन इंद्रजित यांचेसोबत पैसे घेवुन येणेबाबत बोलणे होवुन पैसे घेवुन येतो असे सांगुन तेथुन आम्ही निघुन साळुंके साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली.

पोनि साळुंके साहेबांनी मला व पंचांना सापळा पुर्व पंचनामा सुरु करीत असलेचे सांगुन मला इंद्रजित पाटोळे यांना देणेसाठीची लाच रक्कम हजर करणेस सांगितले. त्यावेळी मी माझेकडे उपलब्ध असलेले रू. 500/- दराची भारतीय वापरातील चलनी 16 नोटा मिळून रु. 8,000/- लाच म्हणून देणेसाठी हजर केले. तेव्हा साळुंके साहेबांनी त्या नोटांचे नंबर्स त्यांचेकडील स्टाफ संदिप पोवार यांचेकडुन लिहून घेवून त्या नोटांना संदिप पोवार यांचेकडुन अँन्थ्रॉसिन पावडर लावून घेतली अल्ट्राव्हायोलेट बॅटरीचे सहायाने मला व पंचांना तपासणी करुन दाखविली. त्यानंतर संदिप पोवार यांनी लाच रक्कम रु. 8,000/- माझे शर्टचे डाव्या बाजुच्या खिषात घडी करुन ठेवली. तसेच मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांना सापळ्याचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि साळुंके साहेबांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर माझे गळयात अडकवुन, तो चालू करुन मला व पंच बंडगर यांना माझे वरील क्रमांकाच्या मोटर सायकलवरून इंद्रजित पाटोळे यांची भेट घेण्यासाठी स्वराज्य हॉस्पिटल येथे पाठविले व पोनि साळुंके साहेब, पंच नं. 2 कुरणे व स्टाफ असे त्यांचे टाटा सुमो गाडीने आमचे पाठोपाठ आले. मी व पंच बंडगर असे स्वराज्य हॉस्पिटलमध्ये गेलो तेथे आपण व स्टाफ तसेच पंच कुरणे असे पाठोपाठ येवुन हॉस्पिटलमध्ये आजुबाजुला थांबल्याचे मी पाहीले होते मी इंद्रजित पाटोळे यांचे केबिनसमोर गेलो त्यावेळी तेथे केबिन बंद होते तेथे एका कर्मचारी यांना विचारले त्यावेळी त्यांनी जेवायला गेले याचे सांगितले त्यानंतर थोडयावेळाने मी माझे मोबाईल क्र.9021808531 यावरून इंद्रजित पाटोळे यांना त्यांचे मोबाईल नंबर 9321947033 यावर फोन केला त्यावेळी त्यांनी मला जेवायला गेल्याचे सांगुन पाच मिनीटात येतो असे सांगितले. थोडयावेळाने ते आले व त्यांचे केबिनमध्ये गेले त्यावेळी मी व पंच बंडगर असे त्यांचे केबिनमध्ये गेलो त्यावेळी मी माझे अंगदुखीबाबत इतर बोलणे करून 8,000/-रू आणल्याचे सांगितले त्यावेळी इंद्रजित यानी दया की असे म्हणाल्यावर मी माझे वरील खिशातील लाच रक्कम 8,000/-रू उजवे हाताने काढुन इंद्रजित यांना दिली त्यावेळी इंद्रजित यांनी ती रक्कम त्यांचे डावे हाताने स्विकारून मोजून त्यांनी त्यांचे जिन्स पॅन्टचे समोरील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवली त्यानंतर लाच रक्कम दिल्याचा पुर्वनियोजित इशार केला असता लगेच साळुंके साहेब आणि त्यांचा स्टाफ तेथे आला व त्यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह इंद्रजित पाटोळे यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर डॉ. पाटोळे यांनाही ताब्यात घेवून पुढील सर्व कार्यवाही ही शासकिय विश्रामगृह गडहिंग्लज येथे पुर्ण करण्यात आली. तेथे मला डॉपाटोळे यांचे व इंद्रजित पाटोळे यांचे पुर्ण नाव 1) अजित वसंतराव पाटोळे,वय 49 वर्षे डॉक्टर ,स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज,रा.2344 साधना हायस्कुलजवळ,संभाजीनगर गडहिंग्लज,ता. गडहिंग्लज,जिल्हा कोल्हापुर,2) इंद्रजित शिवाजीराव पाटोळे, वय 48,व्यवस्थापक स्वराज्य हॉस्पिटल,गडहिंग्लज, रा.मिसाळ चाळ,आझाद रोड,गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज,जिल्हा कोल्हापुर असे असल्याचे समजले

तरी माझा मित्र अमर आनंदा नाईक, वय 24 वर्षे, रा.शेंद्री ता.गडहिंग्लज,जिल्हा कोल्हापुर यांचे डाव्या खुब्याचे ऑपरेशन हे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतुन मोफत करून शासकिय योजनेचा लाभ मिळवुन देण्याच्या हेतुने डॉ. अजित वसंतराव पाटोळे यांनी स्वताकरिता व इंद्रजित शिवाजीराव पाटोळे, व्यवस्थापक स्वराज्य हॉस्पिटल गडहिंग्लज यांनी बेकायदेशिर अप्रमाणिकपणे 20,000/-रू मागणी करून त्यातील ऑपरेशन पुर्वी 10000/- रू. स्विकारून उर्वरीत 10,000/- रुची लाच मागणी करून तडजोडी अंती 8000/-रू इंद्रजित पाटोळे यांनी स्विकारताना त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने माझी 1) अजित वसंतराव पाटोळे,वय 49 वर्षे डॉक्टर, स्वराज्य हॉस्पिटलत्र, गडहिंग्लज, रा.2344 साधना हायस्कुलजवळ, संभाजीनगर गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि. कोल्हापुर 2) इंद्रजित शिवाजीराव पाटोळे, वय 48 वर्षे, व्यवस्थापक, स्वराज्य हॉस्पिटल, गडहिंग्लज,रा.मिसाळ चाळ, आझाद रोड, गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज,जि. कोल्हापुर यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असुन ती मी स्वतः वाचुन

पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.
समक्ष
स.ता.म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
ajay janardan sindkar(I (Inspector)) / PNMAH46135 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
डहिंग्लज पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ajay janardan sindka
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH46135